Sambodhi ISSN : 2249-6661
(UGC Care Journal) Vol - 43 No. - 04 (XII) October-December (2020)

# जागतिकीकरण, लिंगभाव आणि स्त्रिया

**शीतल गायकवाड**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

जागतिकीकरण म्हणजे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, जागतिक व्यापार संघटना याच्यानुसार एखाद्या राष्ट्राने रचनात्मक सुधारणा स्वीकारणे होय. त्यातूनच राष्ट्रात उदारीकरण, खासगीकरण व जागतिकीकरण या प्रक्रिया सुरु होतात. थोडक्यात मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारणे. अशी अर्थव्यवस्था शासकीय नियंत्रणापासून मुक्त असते. जागतिकीकरणाच्या माध्यमातून भांडवल आणि तंत्रज्ञानाच्या मार्गाने पुन्हा एक नव्या प्रकारचा वसाहतवाद गरीब राष्ट्रांमध्ये शिरलेला दिसून येतो. हा वसाहतवाद त्या राष्ट्रांमधील नैसर्गिक साधन संपत्ती, श्रमिक वर्ग आपल्या ताब्यात घेतो. हा वसाहतवाद फायद्यावर आधारित व्यापार धोरणांची आखणी करतो.कार्यक्षमतेच्या नावाखाली सार्वजनिक उद्योगांचे खासगी उद्योगात हस्तांतरण केले जाते. पण प्रत्यक्षात खासगी उद्योग हे नफा तत्त्वावरच भर देतात. त्याचा तळागळातील लोकांना फायदा होत नाही. या सर्वांचा परिणाम समाजातील सर्वात खालच्या स्तरावर असणाऱ्या लोकांवर जास्त होतो. ज्यांच्याकडे गुंतवणुकीसाठी फक्त श्रम आहे. ज्यात दलित, आदिवासी, मजूर, कारागीर, शेतकरी, स्त्रिया यांचा समावेश होतो. (१४ ) पान क्र.- १७ ते २२ जागतिकीकरणाच्या काळात नैसर्गिक संपत्ती वर नियंत्रण येते, नफा हेच एकमेव उद्दिष्ट बनते, आधुनिक तंत्रज्ञान व स्पर्धेला अति महत्व प्राप्त होते. यातून नैसर्गिक उपजीविकेच्या साधनांचा ऱ्हास, बेकारीत वाढ, जंगल, पाणी, जमीन या संसाधनावर बहुराष्ट्रीय कंपन्यांचे नियंत्रण, लोकांचे विस्थापन, देशी उत्पादनांची पीछेहाट असे अनेक प्रश्न निर्माण होतात. जागतिकीकरणामुळे समाजातील तळागाळातील लोक सर्वात जास्त भरडले जातात. स्त्रिया या समाजाच्या अगदी शेवटच्या स्तरावर असल्याने त्या ही जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने जास्तच प्रभावित होताना दिसून येतात. ही प्रक्रिया समाजाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, मानसिक सर्वच क्षेत्रांवर प्रभाव टाकते. जागतिकीकरण प्रक्रियेने लिंगभाव जडण-घडण प्रक्रियेवर परिणाम केला आहे. त्याच बरोबर या प्रक्रियेचा परिणाम स्त्रियांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आरोग्य जीवनावर पण झाला आहे. स्त्रियांना जागतिकीकरणामुळे काही संधी ही मिळाल्या, त्याच बरोबर त्यांचे शोषण वाढण्यास हातभार ही लागला. या काळात स्त्री-पुरुषांच्या भूमिका ठरवणारी लिंगभाव जाणीव नवीन स्वरुपात अधिक रुजवली गेली. पितृसत्ता टिकवून ठेवणाऱ्या विविध माध्यमांचे स्वरूप ही जागतिकीकरणाने प्रभावित झाले आहे.

लिंगभाव जडण-घडण प्रक्रियेतून पितृसत्तेने भूतकाळात आपले अस्तित्व टिकवले. वर्तमान काळात ही ती याचाच आधार घेवून आपले अस्तित्व टिकवून ठेवत आहे. व्यक्तीचे वर्तन, भाषा, केशभूषा, वेशभूषा, राहणीमान याच्या माध्यमातून लिंगभावाची अभिव्यक्ती होत असते. यावर कोणी प्रश्न न विचारल्यास पितृसत्तेला आपली स्थिरता टिकवून ठेवणे शक्य होते. भांडवली विचारप्रणालीच्या उदयाने पितृसत्तेला आव्हान निर्माण झालेले दिसून येते. लिंगभाव अभिव्यक्त करणाऱ्या घटकांमध्ये ही जागतिकीकरण प्रक्रियेने बदल घडून आले. लिंगभावाचे राजकारण हे विविध घटक (जात, धर्म, वंश, वर्ग) यांच्या आधारे केले जाते. जागतिकीकरणाच्या टप्प्यावर हे लिंगभावाच्या मागील राजकारणाचे विविध पदर उलगडले गेले. जागतिक भांडवली अर्थव्यवस्थेच्या काळात या घटकांच्या आधारे स्त्रियांच्या होणाऱ्या शोषणाची तीव्रता अधिक वाढली असे दिसते. (१४) पान क्र.- २१३ ते २२७

लिंग ही एक जीवशास्त्रीय व लिंगभाव ही एक समाजरचित ओळख आहे. या दोन्ही संकल्पना एकाच अर्थाच्या नाहीत. त्यांना वेगळे अर्थ आहेत. लिंगभाव ही संकल्पना समाज, संस्कृती यांच्या माध्यमातून व्यक्ती मनावर जन्मापासून रुजवली जाते. लिंगभाव नैसर्गिक नाही. त्यामुळे त्यात बदल शक्य आहे. समाजातील परिस्थितीच्या बदला सोबतच या संकल्पनेत ही बदल घडून येताना दिसून येतात.(१०)लिंगभाव ही गतिशील व परिवर्तनशील संकल्पना आहे. लिंगभावाची जडण-घडण ही स्थळ, काळ, परिस्थिनुसार होत असते. जागतिकीकरणाचा परिणाम ही या संकल्पनेवर स्थळ, काळ, परिस्थिती नुसार होतो.(2)लिंगभाव जडण-घडण प्रक्रिया कुटुंब, शिक्षण व्यवस्था, वर्ग, वंश, जात धर्म या घटकांच्या आधारे समाजात कार्यरत असते. लिंगभाव जडणघडण करणाऱ्या कुटुंब,

Copyright © 2020 Authors 

 ISSN : 2249-6661
Vol - 43 No. - 04 (XII) October-December (2020)

विवाह, धर्म या माध्यमांचे स्वरूपही जागतिकीकरणाच्या काळात बदलले असल्यामुळे लिंगभाव संबंधावर त्याचा परिणाम झालेला दिसून येतो.

आधुनिकता स्त्रियांमधील लिंगभाव या संकल्पनेला अजून जास्त रुजवते. आधुनिकतेतून विभक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात येवून संयुक्त कुटुंब पद्धतीवर आघात होत आहे. त्यातून स्त्रियांवरील बंधने काही प्रमाणात शिथिल होत आहेत. तरीही विभक्त कुटुंब पद्धती स्त्री व पुरुषांच्या पितृसत्तेने ठरवलेल्या भूमिका बदलण्यात फार यशस्वी ठरलेली दिसत नाही. आधुनिकतेमध्ये स्त्रिया शिक्षित असून ही घराचे पालन पोषण करण्याची जबाबदारी पुरुषांवरच टाकतात. पुरुष जर ही जबाबदारी पूर्ण करू शकले नाहीत तर त्या घटस्फोटाचा मार्ग निवडतात. म्हणजेच एका बाजूला स्त्रिया आधुनिक मुल्यांचा वापर करून पितृसत्तेचीच मुल्ये टिकवण्यावरच भर देतात.

विवाह संस्थेवर जागतिकीकरणाने आघात केला आहे. लिव्ह इन रिलेशनशिप चे प्रमाण वाढले आहे. अरेंज लग्नांमध्ये ही आपल्या पसंतीने लग्न करण्यास मुलींना स्वातंत्र्य मिळाले आहे. पण त्यावर ही जात, धर्म, वंश, वर्ग अशी अनेक बंधने आहेत. आंतर धर्मीय व आंतर जातीय विवाहांची संख्या वाढली असली तरीही यातूनच प्रतिष्ठेच्या नावाखाली होणाऱ्या हत्यांचे प्रमाण आधुनिक काळात जास्त वाढले आहे. भांडवलशाहीच्या विकासाबरोबर प्रेमाची संकल्पना ही मोठ्या प्रमाणात बदलताना दिसून येते. बदलत्या प्रेम संकल्पनेतून स्त्रियांचे होणारे शोषण कमी होण्याऐवजी वाढतच जात आहे. या शोषणाचे विविध प्रकार समोर येत आहेत. हे शोषण फक्त स्त्रियांचेच नाही तर पुरुषांचे ही होत आहे. या बदलत्या प्रेम संकल्पनेने पितृसत्तेच्या कुटुंब, विवाह, जात, धर्म या शोषणणीय संस्थांवर आघात केला असला तरीही, त्यामुळे समाजात नातेसंबंधांबाबत गुंतागुंतीचे प्रश्न ही निर्माण झाले आहेत.

जागतिकीकरणाच्या काळात बदलत्या लैंगिक वर्तनांमुळे स्त्री पुरुष नात्यांमधील गुंतागुंत अधिक वाढत चालली आहे. नातेसंबंधामधील नैतिकता लोप पावल्याचे दिसत आहे. नाती ही अधिक स्व: केंद्रित बनत आहेत. स्त्रीवादाच्या उदयाने पितृसत्तेला आव्हान निर्माण होऊन समाजाच्या विविध घटकांत बदल होत आहेत. तरीही हे बदल पुरेसे नाहीत. या विविध घटकांतील बदलांमध्ये सारखेपणा दिसून येत नाही. समाजात काही स्त्रिया या अजिबात न बदलणाऱ्या, बऱ्याच स्त्रिया काही प्रमाणात बदलणाऱ्या, तर काही स्त्रिया पूर्णपणे बदलेल्या आहेत. पण पुरुषांमध्ये मात्र खुपसे पुरुष न बदलणारे व काहीच पुरुष बदललेले दिसून येतात. या स्त्री पुरुषातील बदलांना स्वीकारणारा समाज मात्र अजून ही निर्माण झाला नाही. म्हणजेच ही बदलाची प्रक्रिया सर्वात जास्त स्त्रिया, त्यानंतर पुरुष आणि शेवटी समाज अशा क्रमवारीत लावता येईल.

वेश्या व्यवसाय हा जरी जुना व्यवसाय असला तरीही जागतिकीकरणाच्या काळात त्याचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. पूर्वीची या व्यवसायाला असणारी प्रतिष्ठा पूर्णपणे तिरस्कारात बदलली आहे. पूर्वी हा व्यवसाय उघड स्वरुपात केला जात होता. त्याला आता छुपे स्वरूप प्राप्त झाले आहे. आधुनिक काळात हा व्यवसाय गरीब, विशिष्ट जातीतील लोकच (स्त्री व पुरुष) करत नाहीत. त्यात उच्चभ्रू, सुशिक्षित, श्रीमंत लोकांचा समावेश आहे. या व्यवसायाला बाजरी स्वरूप आले आहे. पूर्वी प्रमाणे तो फक्त उदर निर्वाहासाठीच केला जात नाही. जास्तीत जास्त पैसा, ऐशोआराम मिळवण्यासाठी, आवड म्हणून, लैंगिक स्वातंत्र्याच्या बदलत्या संकल्पनामुळे, प्रमोशन मिळवण्यासाठी (कंपन्यामध्ये, चित्रपट सृष्टी यात प्रमोशन मिळवण्यासाठी स्त्रियां स्वत:च्या इच्छेने हा व्यवसाय करतात) अशा विविध कारणांसाठी केला जातो. यामुळे समाजात स्त्रियांना पळवून नेण्याचे प्रमाण ही वाढले आहे. वस्तू प्रमाणे स्त्रियांचा खरेदी-विक्री व्यापार वाढला आहे. आधुनिक काळात वेश्यांना माणूस मानून त्यांचे प्रश्न महत्वाचे मानणारी भूमिका जरी घेतली जात असली तरी आदर्श स्त्री विरुद्ध वेश्या स्त्री असे युद्ध रंगवलेले दिसते.(१४) पान क्र.- १४९ ते १५७

प्रसार माध्यमातून स्त्रीची आई ही प्रतिमा (काळजी घेणारी, त्यागी, प्रेमळ) व पुरुषाची पोषणकर्ता, धाडसी, आक्रमक अशी प्रतिमा रंगवली जाते. स्त्रीला विविध क्षेत्रात विकासाची संधी मिळाली असली तरी या क्षेत्रात स्वत:चा विकास घडवून आणण्याचा पुरेसा वेळ स्त्रियांना मिळत नाही. कारण सुपर वूमन या संकल्पनेच्या नावाखाली स्त्रीला आपल्या करिअर सोबतच आपल्या पारंपारिक भूमिका, कामे ही पूर्ण करावीच लागतात. याच सुपर वूमनची प्रतिमा प्रसार माध्यमांच्या विविध जाहिरातींमधून आदर्श स्वरुपात सादर केली जाते. भांडवलशाही ज्या वस्तूंचे उत्पादन करते व ज्या वस्तूंचे जाहिरातीकरण करते त्या सर्व वस्तू स्त्रियांच्या पितृसत्ताक भूमिकेंशी जोडूनच असतात. या वस्तू स्त्रियांच्या पितृसत्ताक भूमिका अधिक ठळक करतात. उदा:- विविध क्रीम, साबण यांच्या वापरातून स्त्री उजळ दिसू लागते. तिचा आत्मविश्वास वाढतो. (स्त्रीच्या बाह्य सौंदर्यावर भर) भांडी कपडे लवकर धुवून व्हावीत म्हणून असणारे साबण (ज्यामुळे स्त्रियांचे काम लवकर होऊन त्या इतर कामासाठी म्हणजेच स्वत:ला आवडणाऱ्या कामांसाठी वेळ देवू शकतील). बाळाचे कपडे, खाण्याचे पदार्थांच्या जाहिराती (मुलांचा सांभाळ करणाऱ्या आईच्या भूमिका

Copyright © 2020 Authors 

ठसवण्यासाठी) यातून स्त्रियांच्या पितृसत्ताक भूमिकाच अधिक ठळक केल्या जाऊ शकतात. त्यांच्या विविध पितृसत्ताक भूमिकांचे उदात्तीकरण केले जाते. मात्र पुरुषांच्या या सर्व घरगुती कामातील सहभागासाठी कोणत्याही प्रकारचे प्रयत्न याच्या माध्यमातून केले जात नाही.

जागतिकीकरणाने निर्माण झालेल्या समस्या दारिद्र्य, बेकारी, मुलभूत सोयी सुविधांचा अभाव यातून निराश झालेले युवक हे व्यसनाच्या आहारी जातात. आपला व्यवस्थेवरील राग काढण्यासाठी त्यांना स्त्री हाच पर्याय असतो. त्यातून स्त्रियांवरील हिंसा ही वाढतच जाते. कधी हा पुरुष वर्ग या समस्यांमुळे मूलतत्ववाद अथवा दहशतवादाचा आधार घेतो. यातून समाजात घडून येणाऱ्या सर्वच हिंसक घटनांमध्ये सर्वात पहिला बळी जातो तो स्त्रियांचाच. पारंपारिक पितृसत्ता ही धर्माचा, धार्मिक नियमांचा आधार घेवून स्त्री शोषणाला हातभार लावत होती. स्त्रीला समूहाची प्रतिष्ठा मानली जात होती. स्त्रिया विविध प्रकारच्या धार्मिक कर्मकांडांत, व्रत वैकल्यात अडकलेल्या होत्या. आधुनिक काळात धर्म ही वैयक्तिक बाब मानली, उदारमतवादाने कोणत्याही संस्थेच्या (जात, धर्म, भाषा, लिंग, वंश) आधारे होणाऱ्या शोषणाला विरोध केला. स्त्रियांना ही शिक्षण मिळाले, त्यातून त्यांच्यात जागृती झाली. त्या अन्यायी धार्मिक नियमांना विरोध करू लागल्या. पण भांडवली अर्थव्यवस्थेच्या काळात मुलतत्ववादी राजकारणामुळे व जमातवादी शक्तींमुळे स्त्रियांचा वापर धर्म रक्षणाच्या नावाखाली हिंसक कारवाईत केला गेला. हा वापर स्त्री शक्तीचे सक्षमीकरण करण्याच्या नावाखाली केला गेला. समाजात जमातवाद पसरवण्यासाठी मुलतत्ववादाचा आधार घेतला जातो. पण या दोन्ही ही संकल्पनांत स्त्रियांवरच नियंत्रणे आणली जातात. मूलतत्ववाद, जमातवाद व पुरुष सत्ता या एकत्रच कार्य करताना दिसून येतात. (५) जागतिकीकरणातून निर्माण झालेल्या समस्यां व त्या सोडवण्यात राज्याला आलेले अपयश यामुळे ओळखेचे राजकारण आकाराला आले. त्यातून स्त्रियांवरील बंधने व अत्याचारात जास्तच वाढ झाली. त्याचे प्रमाण धर्म, जात, वंश, आर्थिक स्तर यानुसार भिन्न भिन्न होते.

जागतिकीकरणामुळे मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढलेले असले तरी त्या शिक्षणाचे उपयुक्तता मूल्य मात्र वाढलेले नाही. शिकण्याचा व्यापक हेतू दिसून येत नाही. शिक्षण प्रक्रियेत शिक्षणा व्यतरिक्तस्त्रियांच्या इतर प्रश्नांकडे (ज्यामुळे त्यांच्या शिक्षणात अडथळा निर्माण होतो) फारसे लक्ष दिले गेले नाही.उदा:- स्वच्छता गृहांचा असणारा अभाव, सुरक्षिततेचे प्रश्न, मुलींच्या शिक्षणाला समाजात न दिले जाणारे महत्व इ.प्रश्न आहेत.शिक्षित मुली ही पितृसत्तेला आव्हान निर्माण न करता त्याच्याच चाकोरीत जगतात.जागतिकीकरणाने सर्वांना शिक्षण घेण्याची समान संधी दिली आहे. परंतु या शिक्षणाने पितृसत्तेला, तिच्या मूल्यांना मोठ्या प्रमाणात आव्हान निर्माण झालेले दिसून येत नाही. तरीही आधुनिक शिक्षणामुळे पितृसत्तेच्या शोषणाची जाणीव आणि त्याबाबत जागृती झालेली दिसून येते. (१४) पान क्र.- ६२ ते ६८

जागतिकीकरण आणि पितृसत्ता यांच्या संगनमताने होणारे शोषण, स्पर्धा व नफ्यावर आधारित जीवनपद्धती, भावनिकतेला दिले जाणारे दुय्यमत्व, नातेसंबंधातील गुंतागुंत अशा विविध कारणांमुळे स्त्रियांच्या मानसिक आरोग्याच्या समस्येत वाढ होत आहे.उदा:- सिझोफ्रेनिया, अल्झायमर, Dual Personality, Multi Personality Disorder इ. तसेच जागतिकीकरणाच्या चंगळवादी आहार संस्कृतीमुळे, जीवन पद्धतीमुळे स्त्रियांमधील शारीरिक आजारांचे प्रमाण ही वाढत आहे. उदा:- कर्करोग, स्थूलपणा इत्यादी. पारंपारिक पितृसत्तेत स्त्रियांच्या आरोग्याचे प्रश्न, आरोग्य योजना या फक्त स्त्रीच्या माता या भुमिकेभोवतीच केंद्रित होतात. तिचे गरोदरपण आणि बाळंतपण इतकी काळजी घेतली की,तिच्या आरोग्याचे प्रश्न संपले अशी भूमिका समाज, शासन,कुटुंबाची दिसून येते. हा दृष्टीकोन आधुनिक काळात ही फारसा बदललेला दिसून येत नाही.त्यामुळे स्त्रीचे इतर मासिक पाळीचे प्रश्न, लैंगिक संसर्ग, इतर मानसिक (सिझोफ्रेनिया, अल्झायमर, Dual Personality, Multi Personality Disorder)व शारीरिक (कर्करोग, स्थूलपणा)आजार दुर्लक्षितच राहतात.समाजातील जात, धर्म, वंश, वर्ग यावर आधारित उतरंडीनुसार स्त्रिया विभागल्या गेल्या असतात. त्यानुसार स्त्री आरोग्य व समस्या भिन्न भिन्न असतात. समाजातील विधवा, परितक्त्या, बालिका, अल्पसंख्यांक, समलिंगी यानुसार ही त्यांच्या आरोग्याचे प्रश्न वेगवेगळे असतात.(१४) पान क्र.- ८२ ते ९०

जागतिकीकरणाने विविध आधुनिक तंत्रज्ञान आणले. या वैज्ञानिक संशोधनाने समाजाची चिकित्सा केलेली असली तरी समाजातील अंधश्रद्धा अजून ही पूर्णपणे दूर झालेल्या नाहीत. अंधश्रद्धा आणि स्त्रिया यांचा अगदी जवळचा संबंध असतो. जो जागतिकीकरणाच्या काळात ही टिकून असलेला आपल्याला दिसून येतो. एका बाजूला या अंधश्रद्धांच्या माध्यमातून पितृसत्ता स्त्रियांवरील आपली सत्ता अधिकाधिक भक्कम करते, तर दुसऱ्या बाजूला भांडवलशाही या अंधश्रद्धांना पाठींबा देत विविध वस्तू उत्पादन व विक्रीतून आपला नफा कमावते. उदा:- वटपोर्णिमा, करवाचौद सारख्या प्रथांमध्ये आवश्यक विविध वस्तूंचे उत्पादन

भांडवलशाही करते. यातूनच भांडवलशाही आपला नफा कमावते आणि पितृसत्ता या प्रथांतून स्त्रियांची दुय्यमता भक्कम करते. या अंधश्रद्धातून स्त्रियांचे आरोग्याचे ही प्रश्न निर्माण होतात. या आधुनिक तंत्रज्ञानाचा फायदा घेऊन मांत्रिक, तांत्रिक बुवाबाजी करणारे लोक या अंधश्रद्धात अधिक भर घालतात. (१४) पान क्र.- २६६ ते २७५

पाणी भरणे, कुटुंबासाठी दुरून पाणी आणणे हे स्त्रियांचेच जन्मसिद्ध काम समजले जाते. पण पाणी प्रश्नांवरील निर्णयात मात्र स्त्रियांचा सहभाग दिसून येत नाही. पाणी टंचाई सारखी समस्या ही सर्वाधिक प्रमाणात स्त्रियांनाच सतावते. जागतिकीकरणामुळे पाणी पुरवठा करणाऱ्या शासन व्यवस्थेचा या क्षेत्रातील हस्तक्षेप कमी झाला आहे. (१४) पान क्र.- ४१ ते ४४ पाण्यासारख्या मुलभूत गरज असणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्तीचाही व्यापार जागतिकीकरणाच्या काळात सुरु झाला आहे. पाण्याच्या व्यापारात हजारो कोटींची उलाढाल होते. पाण्याचे जे विविध प्रकल्प राबवले जातात (धरणे बांधणी, पेय पदार्थांच्या निर्मिती करणाऱ्या कंपन्यांना दिले जाणारे पाणी) त्यासाठी जे विस्थापन केले जाते ते वंचित घटकांचेच असते. या वंचित वर्गाला होणाऱ्या त्रासात स्त्रीला जास्त सहन करावा लागतो. जागतिकीकरणामुळे निर्माण झालेला पाण्याचा तुटवडा दूर करण्यासाठी जे श्रमदान केले जाते, ते ही एक प्रकारची वेठबिगारीच आहे. पाण्याच्या खासगीकरणाने स्त्रियांना पाण्यासारख्या मुलभूत गरजेसाठीही संघर्ष करावा लागत आहे. (१४) पान क्र.-४५ ते ६१

शेतीच्या आधुनिकीकरणामुळे स्त्रियाचे शेती व शेतीतील उपलब्ध रोजगार या क्षेत्रातून सीमांतीकरण झाले. जेव्हा कुटुंब हे उत्पादनाचे प्रमुख केंद्र होते. तेव्हा त्यात स्त्रियांचा असणारा सहभाग हा जास्त होता. त्यांची प्रतिष्ठा होती. पण हे केंद्र जेव्हा कारखान्यांकडे गेले तेव्हा मात्र स्त्रीयांना त्यांचा समाज व कुटुंबातील दर्जा गमवावा लागला. यामुळे स्त्रियांचे असंघटीत क्षेत्रातील प्रमाण जास्त वाढलेले दिसून आले. भारतात असणारे विकासाचे मॉडेल हे भांडवलशाही उत्पादन व्यवस्थेचे आहे. जे स्त्री पुरुष लिंगभाव आधारित भूमिकेवरच आधारलेले असून ते स्त्रियांच्या शोषणाला अधिकच हातभार लावते.औद्योगिक क्रांती बरोबरच स्त्रियांच्या सामाजिक भुमिकेमध्ये ही बदल झाला. गरीब स्त्रीयांना कारखाना व खाणीत काम मिळाले. पण हे काम त्यांना कमी मजुरीतच करावे लागते. त्याच बरोबर नवीन कामगार पिढीची निर्मिती म्हणजेच पुनरुत्पादनाची जबाबदारी ही पूर्ण करावी लागते.या उलट परिस्थिती उच्च वर्गीय स्त्रियांची झाली. त्यांना जागतिकीकरणाच्या काळात शिक्षण, रोजगार, विकासाच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या. पण त्यामुळे त्यांच्या पारंपारिक आदर्श गृहिणीच्या प्रतिमेत व जबाबदारीत जास्त बदल झालाच नाही. आर्थिक स्वावलंबनाची आकांक्षा आणि पारंपारिक जबाबदारीचे ओझे यामध्ये स्त्रियांची कुचंबणा होऊ लागली. स्त्रीची सुपर वूमनची प्रतिमा जन्माला आली. त्यामुळे स्त्री सक्षमीकरण होण्यासाठी फक्त स्त्रियांचे आर्थिक स्वावलंबनच पुरेसे नाही. कारण आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असणाऱ्या स्त्रिया सुद्धा घरात समाजात दुय्यमत्वाचा सामना करतात. स्त्री जरी नवनव्या संधींचा उपभोग घेवून विविध क्षेत्रात प्रवेश करत असली तरी पुरुष अजूनही स्त्रियांच्या स्त्री विशिष्ट घरगुती क्षेत्रात जास्त प्रमाणात आलेला नाही. जो पर्यंत पितृसत्ताक वर्चस्वी वृत्ती, वर्तन, मत यामध्ये बदल होत नाही तोपर्यंत आर्थिक स्वावलंबन अपुरे आहे.(1)

जागतिकीकरण प्रक्रियेने उद्योगांचे जे खासगीकरण झाले त्यामुळे स्पर्धा, नफा ही मुल्ये महत्वाची ठरू लागली. देशी उद्योग बंद पडू लागले. सरकारी उद्योगातून कामगार कपात होऊ लागली. पुरुषांचा रोजगार जाऊ लागला. या मुळे स्त्रियांना असणारा थोडा जो काही रोजगार होता त्यावर ही बेकार पुरुषांमुळे ताण आला. कल्याणकारी शासनाचे स्वरूप बदलू लागले. शासनाचा व्यक्ती जीवनातील सकारात्मक हस्तक्षेप कमी झाला. आरोग्य, शिक्षण यातील निधीच्या कपातीमुळे स्त्रियांच्या समस्यात अजूनच वाढ झाली. त्यामुळे स्त्रीचे दारिद्रीकरण होण्यास सुरवात झाली. कारण स्त्री ही फक्त समाजाच्या उतरंडीतच खालच्या स्तरावर नसते तर ती कुटुंबातही सर्वात शेवटी येते. तिच्या आहार, शिक्षण, आरोग्य, आवडी-निवडी, महत्वकांक्षा यांचा विचार फारसा केला जात नाही. केलाच तर अगदी शेवटी केला जातो. जागतिकीकरणाने स्त्रियांना मिळणारा अर्धकुशल कमी वेळचा घरगुती रोजगार जरी वाढला असला,तरीही त्यांच्या पारंपारिक भूमिका विशिष्ट असा तो रोजगार आहे.बहुराष्ट्रीय कंपन्यांचा शेतीतील व शेती उत्पादनातील हस्तक्षेपामुळे रोजगाराच्या क्षेत्रातून स्त्रियां हद्दपार झालेल्या दिसून येतात.पुरुषांच्या हाती आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण झाल्याने व स्त्रियांच्या रोजगाराची क्षेत्रे कमी झाल्याने त्या वेश्या प्रवृत्ती कडे वळताना दिसून येतात. रोजगार निर्मिती झाली असली तरीही अर्धवेळ व लवचिक नोकऱ्यांमुळे स्त्रियांच्या नोकऱ्यांना कायद्याचे संरक्षण ही मिळत नाही. आरोग्य सेवा, भविष्य निर्वाह निधी, स्वच्छता गृहे यांचाही अभाव असतोच.

जागतिकीकरणामुळे दलित पुरुषांप्रमाणेच दलित स्त्रियांना ही जातीनिष्ठ व्यवसाया व्यतरिक्त इतर व्यवसाय करण्याचे स्वतान्त्र्य मिळाले. पण तरीही त्यांचे प्रमाण कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या व्यवसायातच जास्त दिसून येते. कारण भांडवलशाहीने संधी दिली

पण संधीचा वापर करता येईल अशी परिस्थिती निर्माण करण्यावर भर दिला नाही. स्वस्त मजूर व स्वस्त श्रम पुरवठा हा भांडवलशाहीच्या फायद्याचाच होता. त्यांनी पारंपारिक श्रम विभागणी टिकवण्यावरच भर दिला. (१४) पान क्र.-१७८ ते १९४ शेतीत मजुरी करणाऱ्या पुरुषांपेक्षा स्त्रियांचं प्रमाण हे जास्त असल्याने शेतीचे स्त्रीकरण झाले असे म्हणले जाते. पण जरी जास्तीत जास्त स्त्रिया शेती व्यवसाय व मजुरीत व्यस्त असल्या तरीही त्यातील रोजगाराचे स्वरूप अल्पकाळा पुरतेच आहे. खूपच कमी स्त्रियांच्या मालकीची शेती व उत्पादन साधने असलेली दिसून येतात. त्यामुळे ज्या शेतीवर स्त्रिया अधिक अवलंबून आहेत त्या शेत जमिनीची खरेदी विक्री त्या करू शकत नाही. (१४) पान क्र.- २३ ते ३३

पितृसत्ता व्यवस्थेचे अस्तित्व हे 2 पातळ्यांवर दिसून येते. रचनात्मक पातळीवर म्हणजेच समाजातील विविध संस्थांमध्ये दृश्य स्वरुपात दिसून येते. येथे पुरुषांचेच वर्चस्व व संख्या जास्त आहे. तर विचारप्रणालीच्या पातळीवर अदृश्य स्वरुपात दिसून येते. म्हणजेच मानसिकतेत पितृसत्तेची मुल्ये रुजवली जातात. उदा:- प्रसार माध्यमे, जाहिराती, फिल्मस (त्यामधील स्त्रीच्या पितृसत्तेने ठरवलेल्या भूमिकांचे उदात्तीकरण करणे, विविध आयटम सॉंग च्या माध्यमातून स्त्री देहाचे प्रदर्शन करणे.) यातून स्त्रीची उपभोगाची वस्तू, काळजी घेणारी, कमजोर अशी प्रतिमा तर पुरुषाची वर्चस्वशाली, धाडसी अशी प्रतिमा निर्माण केली जाते. पूर्वीची पितृसत्ता ही धार्मिक / पारंपारिक स्वरुपाची होती. आज तिचे स्वरूप आधुनिक व भांडवलशाहीचे आहे. जी पूर्वी पेक्षा जास्त प्रमाणात स्त्रियांचे शोषण करते. तिचे हे स्वरूप अदृश्य आहे. त्यामुळे तिने केलेले शोषण उघड उघड दिसून येत नाही. उदा:- सौंदर्य प्रसाधनाचे उत्पादन – स्त्री शरीराला तिच्या गुणांपेक्षा अधिक महत्व, पोर्नोग्राफी – स्त्रीकडे उपभोगी वस्तू म्हणून पाहणे, खेळणी निर्मिती – स्त्री पुरुषांच्या विशिष्ट भूमिका घडवणाऱ्या खेळण्यांची निर्मिती याद्वारे आधुनिक पितृसत्ता नफा ही कमावते आणि आपली मूल्य व्यवस्थाही टिकवून ठेवते.(1)

पूर्वी समाजात स्त्री शोषणाचे बालविवाह, सती प्रथा, स्त्री निरक्षरता, विधवा पुनर्विवाहाला बंदी, कुमारी माता कलंक मानणे, आंतर धर्मीय-जातीय विवाह बंदी, केशवपन असे प्रकार होते. जागतिकीकरणामुळे स्त्री शोषणाचे नवीन छुप्या स्वरूपाचे प्रकार निर्माण झाले आहेत. आधुनिक तंत्रज्ञानामुळे समाजात स्त्री भृणहत्या वाढल्या आहेत. पोर्नोग्राफी पाहणाऱ्यांची वाढती संख्या यातून स्त्री ही उपभोगाचीच वस्तू हा समाज अधिक पक्का झाला आहे. लैंगिक संबंधांचे बदलते स्वरूप यातून अनेक भावनिक प्रश्न निर्माण व्हायला लागले आहेत. हे प्रश्न स्त्रियांच्याच नाही तर पुरुषांच्या बाबतीत ही वाढत आहेत.पोर्नोग्राफी पाहणाऱ्यांची संख्या जरी समाजात वाढत असली तरी लैंगिक शिक्षण सुरु करावे याबाबत याच लोकांचा नकारात्मक दृष्टीकोन दिसून येतो. कारण लैंगिक शिक्षण जर व्यक्तीला योग्य वयात मिळाले तर व्यक्ती या पोर्नोग्राफीच्या आहारी जाणार नाही. यामुळे भांडवलशाही जिचा प्रचंड मोठा नफा या उद्योगावर आधारलेला आहे. तो तिला गमवावा लागेल.या पोर्नोग्राफीतून स्त्रीची प्रतिमा उपभोगाची वस्तू अशी तर होतेच, पण त्यातून निर्माण होणाऱ्या पुरुषांच्या विकृत लैंगिक गरजा पुरवताना बळी जातो तोही स्त्रीचाच.

जागतिकीकरणाच्या काळात स्त्रियांची सौंदर्याची संकल्पना ही सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही बाजूने बदललेली दिसते. पारंपारिक पितृसत्ता ही पुरुषाच्या सामर्थ्याला अन स्त्रीच्या सौंदर्याला महत्व देते. स्त्रीवादी लढ्यात 'आमच्या शरीरावर आमचा हक्क' या स्त्रीवादी घोषणेने स्त्रियां संबंधीच्या या पितृसत्ताक सौंदर्यवादी संकल्पनेत बदल झालेला दिसून येतो. एका बाजूला स्त्रिया स्वत:च्या नजरेतून स्वत:चे सौंदर्य पाहू लागल्या तर दुसऱ्या बाजूला उपभोगवादी, चंगळवादी भांडवलशाही व्यवस्थेने स्त्रीच्या सौंदर्याला वस्तुकरणाच्या चौकटीत नेवून बसवले. स्त्रीच्या शरीर सौंदर्याच्या प्रदर्शनासाठी सौंदर्य स्पर्धा, Fashion Show उभारले जाऊ लागले. ज्यांच्या मागे मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल केली जाते. स्त्रीच्या शरीराला वस्तू मानण्याची प्रक्रिया ही पूर्वी खासगी पातळी वर जास्त व सार्वजनिक पातळी वर कमी होती. तिला या काळात सार्वजनिक पातळीवर बाजारी स्वरूप आले. याच सौंदर्याच्या नावाखाली स्त्रीने तिच्या नैसर्गिक मातृत्वाला ही बऱ्याच वेळा नाकारलेले दिसून येते. (४) पान क्र.- १३स्त्रीच्या पुरुष सापेक्षी दृष्टिकोनातील सौंदर्याला दिल्या गेलेल्या अति महत्वामुळे काळ्या, कुरूप, लठ्ठ असणाऱ्या स्त्रियांना आपोआपच कमी लेखले जाते. त्यामुळे स्त्रिया स्त्रियांमध्ये दरी, संघर्ष निर्माण झालेला दिसून येतो. (६)

पारंपारिक पितृसत्तेने स्त्रीची एक उत्तम गृहिणीची जी प्रतिमा रंगवलेली होती, ती प्रतिमा जागतिकीकरणाच्या काळात पूर्णपणे बदललेली दिसत नाही. उलट भांडवली अर्थव्यवस्थेने आपल्या फायद्यासाठी या गृहिणी प्रतिमेचा आधार घेऊन समाजात गृहिणींचा मोठा ग्राहक वर्ग निर्माण करण्यावर भर दिला. विविध जाहिरातींच्या माध्यमातून आदर्श गृहिणीची प्रतिमा जनसामान्यांच्या विशेषता स्त्रियांच्या मनात निर्माण केली. (४) पान क्र.- १८ औद्योगिक क्रांतीमुळे कमीत कमी श्रमात जास्तीत जास्त उत्पादन करणे शक्य झाले. वाढत्या उत्पादना बरोबर स्त्रियांच्या श्रमाचे मूल्य मात्र घसरत गेले. स्त्रिया या जास्तीत जास्त

असंघटीत, अकुशल कामाच्या क्षेत्रात ढकलल्या गेल्या. त्यांचे रोजगार क्षेत्रातूनच सीमांतीकरण झाले.स्त्रियांना अतिशय कमी वेतनावर कामावर ठेवणे शक्य झाले. कमीत कमी सुविधांमध्ये काम करवून घेणे, कामावरून कधीही काढून टाकणे शक्य झाले,औद्योगिक क्रांतीने तंत्रज्ञानात झालेला बदल, त्यातून झालेला आर्थिक विकास यामुळे एका बाजूला गरीब वर्गातील स्त्रियांचे रोजगाराच्या क्षेत्रातून सीमांतीकरण झाले. उच्च वर्गीय स्त्रियांचे पुन्हा घरगुतीकरण करण्यात आले. त्यांच्यावर पुन्हा कुटुंब, समुदायाच्या प्रतिष्ठेची जबाबदारी टाकण्यात आली.उदा:- हरित क्रांतीच्या माध्यमातून शेतीचे जे आधुनिकीकरण झाले त्यातून शेतीचे पुरुषीकरणच झाले. गरीब स्त्रिया पारंपारिक, अकुशल उद्योगधंद्यातच अडकून पडल्या तर उच्च वर्गीय स्त्रियांचे घरगुतीकरण झाले.(1) Page no. 54बेनहॉल्ट थॉमसन यांच्या मते,आधुनिक पैसा व व्यापारी अर्थव्यवस्था यांचे नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी स्त्रियांची रवानगी विना अल्प वेतन क्षेत्रात केली जाते. यालाच स्त्रीचे गृहिणीकरण अथवा घरगुतीकरण म्हणले जाते.

भांडवलशाहीच्या काळात लिंगभावावर आधारित श्रम विभागणी नष्ट तर झाली नाहीच पण भांडवलशाहीने आपल्या फायद्यासाठी ही श्रम विभागणी अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न केला आहे. कौटुंबिक आणि सार्वजनिक पातळीवर अजूनही ही श्रम विभागणी अस्तित्वात आहे. उच्च शिक्षण, औद्योगिकीकरण, विज्ञान- तंत्रज्ञान या क्षेत्रात स्त्रियांचे प्रमाण असले तरी ते अतिशय कमी आहे. (आकडेवारी) भांडवलशाहीने स्त्रियांच्या दुय्यमीकरणाला हातभार लावला. भांडवलशाहीने स्त्रियांना श्रमिकांची राखीव फौज, समान कामाला समान वेतन न देणे, कमी वेतनात काम करणाऱ्या, कधी ही कामावरून काढून टाकता येणाऱ्या, भावी कामगार पिढी निर्माण करणाऱ्या, ग्राहक याच दृष्टीकोनातून पाहिलेले दिसून येते. येथे भांडवलशाही व पुरुष सत्ता यांची हातमिळवणी दिसून येते. पारंपारिक काळात अर्थव्यवस्थेचे स्वरूप घरगुती होते. या वेळी श्रम विभागणी असली तरी ती काटेकोर व लिंगावर आधारित अशी नव्हती. कारण अर्थव्यवस्थेत पुरुषां इतकाच स्त्रियांचा सहभाग होता. कोणाचेही श्रम दुय्यम नव्हते. पण ज्या वेळी अर्थव्यवस्था बाजारकेंद्री बनली, तिचे कार्यक्षेत्र घर न राहता बाजार बनले. या अर्थव्यवस्थेत पुरुषांचाच सहभाग जास्त होता. अर्थव्यवस्थेतील उत्पादनाचे स्वरूप उदरनिर्वाहाचे न राहता त्याची जागा बाजारपेठ व नफा या संकल्पनांनी घेतली. स्त्री-पुरुषांची श्रम विभागणी काटेकोर बनली. स्त्रियांचे कार्यक्षेत्र घर मानले गेले. घरात स्त्रियांनी केलेल्या श्रमाला श्रमही न मानता ते त्यांच्या कर्तव्याशी जोडले गेले. घरातील कामाला विना मोबदला समजून ते मूल्य हीन ठरवले जाते. जागतिकीकरणाच्या काळात ही स्त्रियांचे श्रम कमी करण्यासाठी मदत करणाऱ्या विविध आधुनिक उपकरणांचा शोध लागला. पण ती कामे स्त्रियांचीच ही भूमिका बदलली नाही. स्त्रियांच्या या कामाला मूल्यही दिले गेले नाही. (1) Page no. 45 आणि (१) पान क्र.- ४९

भांडवलशाहीतून झालेल्या आर्थिक विकासामुळे स्त्रीयांना जसे स्वातंत्र्य मिळाले तसे त्यांच्या वरची काही बंधने ही वाढतच गेली. विशेषता स्त्रीला वागण्या-बोलण्याचे स्वातंत्र्य मिळाले असले तरी तिच्या लैंगिकते वरील बंधने मात्र कमी न होता अजून वाढलेलीच दिसून येतात.पोर्नोग्राफी, सौंदर्य प्रसाधने, जनन क्षमतेवर नियंत्रण मिळवणारी साधने यांनी एका बाजूला स्त्रीला स्वातंत्र्य दिले (आपल्याला हवे ते करण्याचे) व दुसऱ्या बाजूला तिचा आपल्या फायद्यासाठी वापर करून घेतला. पोर्नोग्राफी च्या माध्यमातून ती एक उपभोगाची वस्तू आहे ही मानसिकता समाजात पक्की केली. सौंदर्य प्रसाधनांच्या माध्यमातून तिच्या शारीरिक व पुरुष सापेक्षी सौंदर्यावर भर दिला. जनन क्षमतेवरील नियंत्रण साधनांच्या माध्यमातून तिच्यावर विविध प्रयोग करण्यात आले. कुटुंब नियोजनाचा मुद्दा तिच्याशीच जोडला गेला. त्याच्यातील पुरुष सहभागाकडे दुर्लक्ष केले गेले.(1) page no. 36यातून हे स्पष्ट होते कि पूर्वी स्त्रियांच्या श्रमावर, प्रजनन क्षमतेवर, लैंगिकते वर कुटुंब, धर्म, जात या संस्थांची बंधने होती. त्यातच राज्य व भांडवली अर्थव्यवस्था यांचा समावेश झाला.

लिंगभाव ही संकल्पना सामाजिक व सांस्कृतिक रचित असल्यामुळे ती काळ, स्थळ, समाज, संस्कृती,कुटुंब यानुसार बदलताना दिसून येते. जागतिकीकरणाच्या काळात लिंगभाव हा पूर्णपणे नष्ट झाला नाही, पण त्यावर या प्रक्रियेचे काही सकारात्मक व नकारात्मक परिणाम होत आहेत. हे परिणाम ही समाजातील भिन्न भिन्न सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक परिस्थितीनुसार आहेत.ज्या समाजात खासगी व सार्वजनिक क्षेत्रातील दरी जितकी जास्त तिथे स्त्रियांचे प्रश्न हे जास्त असलेले दिसून येतात. कारण अशा समाजात खासगी गोष्टीतील हस्तक्षेप नाकारला जातो. त्यामुळे खासगी क्षेत्रातील शोषणावर नियंत्रण ठेवणे अशक्य होते.(1) Page no. 47

लिंगभाव विकास हा आपोआपच घडून येत नाही. त्यासाठी काही प्रयत्न करणे गरजेचे आहे. (gender budget concept) लिंगभावावर आधारित अशा अंदाजपत्रकाची गरज आहे. ज्यामध्ये स्त्रियांच्या विकासासाठी आवश्यक अशा तरतुदींचा समावेश असेल.भांडवली समाज व्यवस्थेमध्ये स्त्री-पुरुष समतेचा पुरस्कार केला जात असला तरी स्त्रियांच्या शोषणासंबंधी मांडलेल्या

Copyright © 2020 Authors 

ISSN : 2249-6661
Vol - 43 No. - 04 (XII) October-December (2020)

पारंपारिक गृहितकांना अधिक मोठ्या प्रमाणात रुजवण्याचे काम या समाज व्यवस्थेत झालेले दिसते. जागतिकीकरणाचे काही सकारात्मक तर काही नकारात्मक परिणाम झालेले दिसून येतात.

आधुनिकीकरणाच्या माध्यमातून आलेली पाश्चात्य संस्कृती व तिची मूल्य यामुळे समाजात लैंगिक समानतेचा अर्थ पुरुष जे करतात ते सर्व स्त्रियांनी करणे असा लावला गेला. यातून स्त्रीवाद व स्त्री प्रश्नांना एक वेगळेच स्वरूप लागलेले दिसून येते. मद्यपान, अमली पदार्थ, घटस्फोटांचे वाढते प्रमाण, स्त्री-पुरुष यांच्या स्वतंत्र जीवनशैली मुळे मुलांची होणारी फरफट इ. नकारात्मक परिणाम झाले. तर याचा सकारात्मक परिणाम असा ही झाला कि स्त्री प्रश्नांना वाचा फोडणारे विविध चित्रपट येऊ लागले. (पिंक, मर्दानी, पॅड मॅन, छपाक, लिपस्टिक अंडर द बुरखा, आर्टिकल १५)जागतिकीकरण प्रक्रियेने स्त्री प्रश्नाचे राजकीयीकरण (स्वत:चे प्रश्न, दडपणूक, शोषण इतरांच्या प्रश्नाशी, समाजाच्या आकृतिबंधाशी जोडून पाहणे होय) होण्यास सुरवात झाली. आधुनिक भांडवली व्यवस्थेने रुजवलेली पितृसत्ताक मुल्ये / गृहीतके खालील प्रमाणे :-

१) अश्लील चित्रपटातून स्त्रीही उपभोगाची वस्तू ही प्रतिमा रुजवणे.

२) स्त्री-पुरुष लिंगभावावर आधारित श्रम विभागणी.

३) हुंड्याचे व्यापारीकरण (हुंडा भांडवल संचयाचे एक महत्वाचे साधन मानले गेले. (१) पान क्र.- ३७

४) मुलगी दुय्यम मानल्यामुळे स्त्रियांच्या लिंग गुणोत्तरात होणारी घट आणि स्त्री भृणहत्यांचे वाढते प्रमाण.

५) स्त्री ही उपभोगाची वस्तू मानली जात असल्यामुळे स्त्रियांवरील वाढते बलात्कार.

६) भांडवलशाहीने निर्माण केलेल्या सर्व गृहपयोगी, मनोरंजनात्मक वस्तूंच्या खपासाठीविविध जाहिरातींच्या माध्यमातून स्त्रियांना आपला ग्राहक वर्ग बनवले गेले. स्त्रीच्या गृहिणी पदाचा गौरव केला गेला.

७) जागतिकीकरणाच्या काळात स्त्रियांची अविवाहित अथवा घटस्फोट घेवून एकटे जीवन जगण्याची संख्या पूर्वीच्या तुलनेत वाढत असली तरीही अशा स्त्रिया म्हणजे सार्वजनिक मालमत्ता ही मानसिकता बदललेली नाही.

८) जागतिकीकरणामुळे स्त्रियांना प्रजनन क्षमता नियंत्रित करण्यासाठी विविध साधने उपलब्ध झाली. पण कुटुंब नियोजनाची जबाबदारी स्त्रियांचीच हा दृष्टीकोन बदलला नाही.

९) स्त्रियांच्या आरोग्य सुविधांमध्ये ही खूप वाढ झाली. पण या आरोग्याच्या सोयी स्त्रियांच्या आरोग्यासाठी नसून तिच्या माता या भूमिकेभोवती केंद्रित झाल्या होत्या.

१०) सौंदर्याच्या संकल्पनेला अवाजवी महत्व आधुनिक काळात ही दिले गेले.

जागतिकीकरणाच्या काळात स्त्रीच्या स्त्रीत्वातच नाही तर पुरुषत्वात ही बदल झाला आहे. आधुनिक काळात स्त्रियां बरोबरच पुरुषांच्या वस्तूकरणास ही सुरवात झाली आहे. पुरुषांमध्ये ही उदार निर्वाह, ऐशोआरामी जीवनासाठी शरीर विक्रीचा व्यवसाय केला जाऊ लागला आहे. पुरुषांच्या धाडसी, शूर या प्रतिमा सोबतच त्याच्या सौंदर्यावर ही विविध जाहिरातींमधून प्रसार माध्यमे भर देताना दिसून येतात.

थोडक्यातजागतिकीकरणामुळे कुटुंब व विवाह या पितृसत्तेच्या महत्वाच्या संस्थांवर आघात झाला. त्यातून स्त्री काही प्रमाणात तरी स्वतंत्र झाली. पूर्वी प्रमाणे विवाहाचा अर्थ समाजमान्य लैंगिक इच्छा पूर्तीचे माध्यम, प्रजोत्पादनासाठी आवश्यक संस्था हाच राहिला नाही.अपत्य नियोजनात पुरुषाचा पुढाकार, अपत्य संगोपनात त्याचा समान सहभाग याची मागणी केली जाऊ लागली.जागतिकीकरणामुळे एका बाजूला स्त्रियांच्या श्रमाचे लैंगिकिकरण झाले, तर दुसऱ्या बाजूला स्त्रियांवर संस्कृती रक्षणाची जबाबदारी टाकली गेली. धार्मिक व जातीय अस्मितेतेतून स्त्री प्रश्न जमातवादी चौकटीत अडकवला गेला. भांडवलशाहीतून निर्माण झालेले प्रश्न सोडवण्यात जेव्हा अपयश येते त्याच वेळी तेव्हा जमातवादाच्या राजकारणाचा आधार घेतला गेला. या आधारेच लिंगभावाचे राजकारण केले जाते. स्त्रियांचा वापर करून समूहाची अस्मिता घडवली गेली.

जागतिकीकरणामुळे चंगळवादी संस्कृती वाढली असून चैनीच्या, ऐशो आरामाच्या जीवनालाच सर्व काही मानण्याची प्रवृत्ती निर्माण झाली आहे. यातूनच गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. हुंडा घेण्याचे व हुंडाबळीच्या प्रमाणात वाढ झाली आहे. अश्लील चित्रातून स्त्रियांना ब्लकमेल करण्याचे प्रमाण वाढले आहे. एकतर्फी प्रेमातून होणाऱ्या हत्यांचे प्रमाण वाढले आहे. प्रसार

Copyright © 2020 Authors

माध्यमातील विविध आदर्श स्त्री प्रतिमांमुळे, विविध मालिका तील आदर्श स्त्री (पत्नी, सून, आई) यांच्यामुळे स्त्रिया जास्त प्रमाणात त्या पारंपारिक प्रथांकडे वळत आहेत. उदा:- भांग मै सिंदूर ही संकल्पना आज सगळीकडेच दिसते. जी पूर्वी सगळीकडे नव्हती.

दक्षिण आशियात एका बाजूला स्त्रियांसाठी अनेक आधुनिक कायदे बनवण्यात आलेले आहेत. लिंगभाव विषयावर जाणीव जागृती, अभिव्यक्ती वाढलेली आहे. पण तरीही दुसऱ्या बाजूला धर्मांधता, पितृसत्तेचे पुनरुत्थान व त्यातून स्त्रियांवर अधिकाधिक बंधने लादली जात आहेत. जागतिकीकरणामुळे स्त्री शोषणाच्या विविध प्रकारांचा प्रसार पण मोठ्या प्रमाणात झाला आहे. उदा:- उत्तर व मध्य भारतात प्रसिद्ध असलेली हुंडा व बालहत्येची प्रथा दक्षिण भारतात नसताना ही आता ती सुरु झाली आहे. (1) उदा:- आदिवासी समाजांमध्ये पूर्वी लैंगिक समानता अस्तित्वात होती. स्त्री शोषणाच्या प्रथा नव्हत्या, स्त्रीच्या लैंगिकतेवर बंधने नव्हती. आज जागतिकीकरण व आधुनिकतेमुळे अशा समाजात स्त्री शोषणाचे विविध प्रकार (हुंडा, घरेलू हिंसा, लैंगिक स्वातंत्र्यावर बंधन, योनी शुचिता) पोहचले आहेत. या समाजात ही पितृसत्ता, पैसा, व्यापारीकरण ही मूल्य महत्वाची ठरू लागली आहेत. (१४) पान क्र.- १७० ते १७४

## संदर्भ

१) गांधी नंदिता आणि नंदिता सहा (मराठी अनुवाद – भा. र. भागवत), स्त्री संघर्षाची नवी रूपे, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि.

२) गुप्ता चारू, २०१६, पुरुषत्वाच्या प्रतिमा, पुणे, हरिती प्रकाशन.

३) देहाडराय स्वाती, २००६, लिंगभावाचे राजकारण आणि जमातवाद : आकलन, पुणे, प्रतिमा प्रकाशन.

४) धोंगडे आश्विनी, १९९३, स्त्रीवादी समिक्षा : स्वरूप आणि उपाययोजन, पुणे, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि.

५) पळशीकर सुहास, २००६, जमातवाद, धर्म निरपेक्षता आणि लोकशाही, पुणे, प्रतिमा प्रकाशन.

६) पाटील भारती,२०१४,स्त्रिया : समाज आणि राजकारण, पुणे, हार्मिस प्रकाशन.

७) पुनियानी राम, (अनु. प्रदीप देशपांडे), २००७, जमातवादाचे राजकारण – मिथके आणि वास्तव, पुणे, सुगावा प्रकाशन.

८) बुरटे अरुणा, २०१३, अर्धे आकाश पेलताना - लिंगभाव, पुरुषप्रधानता, पितृसत्ता , सोलापूर, परिवर्तन अकादमी प्रकाशन.)

९) भसीन कमला (अनु.- मीना देवल, जया वेलणकर), १९९५, पुरुष प्रधानतेचे गौडबंगल, मुंबई, अक्षर प्रकाशन.

१०) भसीन कमला (मराठी अनुवाद –श्रुती तांबे), २०१०, लिंगभाव समजून घेताना, मुंबई, लोक वाड्मय गृह.

११) भसीन कमला (मराठी अनुवाद – निर्मला जाधव),२०१५, पुरुषत्व उकलताना, औरंगाबाद, ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.

१२) भागवत विद्युत, (संपा.-शर्मिला रेगे), २०००, भारतातील समकालीन कळीचे प्रश्न : स्त्रीवादी चर्चा विश्वाचा आढावा, पुणे, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे, पुणे.

१३) भागवत विद्युत, २००९, स्त्रीवादी इतिहास, मीमांसा आणि व्यवहार, पुणे, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ.

१४) स्वाधार, २००४,शोध बाई माणसाच्या जिण्याचा, मुंबई, अक्षर प्रकाशन.

१५) सिमोन द बोव्हुआर ( मराठी अनुवाद – गोखले करुणा), २०१२, द सेकंड सेक्स, पुणे, पद्यगंधा प्रकाशन.

१६) सुमंत यशवंत,२०१२, स्त्रीवादाची ओळख, पुणे, राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ,पुणे.

## इंग्रजी संदर्भ

1) Bhasinkmla, Nighat said khan,1986, feminism and its relevance in south asia, delhi, women unlimited.

2) Bhasinkamla, 2005,What is a girl? What is a boy?Delhi,jagori publication.

❑❑❑

Copyright © 2020 Authors